नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 21/07/2020 (मंगळवार)
(सकाळ)

---

## कळमेश्वर शहरात गोळीबार करनारी नागपूर शहरातील अटट्ल गुन्हेगार टोळी गजाआड 24 तासाचे आत 10 आरोपीनां अटक स्थानिक गुन्हे शाखेची कामगीरी

दिनांक 20/07/2020 रोजी दिवसा 11.30 वाजता पोलीस स्टेशन कळमेश्वर अतंर्गत श्रीनीकेतन कॉलनी येथे अज्ञात गुन्हेगारांनी जुने वैमनस्य चे कारणावरून गणेश मेश्राम व त्याची पत्नी प्रियंका मेश्राम यांना जिवानीशी ठार करण्याचे ईरादयाने घरात घुसुन अग्निशस्त्राने गोळीबार करून दोघांनाही गंभीर जख्मी केले होते. याबाबत पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपी नामे 1) गोलु मलिये रा. नागपूर, 2) फारूख खान, रा. नागपूर 3) शोवीन मोकोडे रा. कळमेश्वर व त्यांचे ईतर 3 ते 4 अज्ञात सहकारी विरूध्द अप.क्र. 469/20 कलम 307, 34 भादवी सहकलम 3/25 भा.ह.का चा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहता पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे विनाविलंब भेट देवुन मौक्यावर हजर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिटट्‌ावार यांना गुन्हयाचा समांतर तपास करून गुन्हा उघड करण्याचे निर्देश दिल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिटट्‌ावार यांनी आपले अधिनस्थ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तीन विशेष पथक तयार करून वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली अज्ञात आरोपींचा शोध घेण्यास सुरूवात केली.

समांतर तपास दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनिय सुत्राचे मदतीने 1) गोलु मलिये रा. नागपूर, 2) फारूख खान, रा. नागपूर 3) शोवीन मोकोडे रा. कळमेश्वर यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता काहीच माहिती दिली नाही, त्यानुसार पथकाने अधिकची गोपनिय माहीती काढली असता जख्मी गणेश मेश्राम व गोलु मलिये यांचे जुने वैम्यनस्य चे कारणावरून अंदाजे 15 दिवसापुर्वी पोलीस स्टेशन प्रतापनगर नागपूर शहर हददीत वाद झाला होता. या माहितीच्या आधारे जयताळा परीसरात फिरून अटट्ल गुन्हेगार व गोलु मलिये चा सहकारी हिमांशु रविशंकर चंद्राकर रा. गजानन नगर, त्रिमुर्ती नगर नागपूर, यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने आपले ईतर सहकारी चे मदतीने गुन्हा केल्याचे सांगितले वरुन ईतर सहकारी आरोपींना 24 तासाचे आत नागपूर शहरातील विविध ठिकणाहुन ताब्यात घेवुन गुन्हा उघड केला.

ताब्यात घेतलेल्या आरोपीनी दिलेल्या माहिती प्रमाणे आरोपी निखील उर्फ गोलु वल्द लालसींग मलीये याचे सोबत गुन्हयातील जख्मी नामे गणेश मेश्राम रा. कळमेश्वर याचे जुने वैम्यनस्य आहे. अंदाजे 15 दिवसापुर्वी जख्मी नामे गणेश मेश्राम याचे सोबत त्याचे पो.स्टे. प्रतापनगर नागपूर शहर हददीत भांडण झाले होते याबाबत पो.स्टे. प्रतापनगर येथे जख्मी व त्याचे दोन साथीदार विरूध्द गुन्हा नोंद झाला होता. याचा सुड घेण्याचे ईरादयाने आरोपीने आपले मित्र आरोपी फारूख वल्द जबीऊल्ला खान, यास जख्मी

गणेश मेश्राम हा कळमेश्वरला कोठे राहतो याचा पता काढण्यास सांगितले त्याप्रमाणे आरोपी शोवीन वल्द अरविंद माकोडे, याने फारूख खान यास जख्मी गणेश मेश्राम राहत असलेल्या ठिकाणाचा पता काढण्यास मदत केली. त्यानंतर 12 ते 15 दिवसात निखील उर्फ गोलु ने सहकारी हिमांशु रविशंकर चंद्राकर वय 24 वर्ष, रा. 13/3 गजानन नगर त्रिमुर्ती नगर नागपूर, मोहम्मद हैदर वल्द परवेज अन्सारी वय 20 वर्ष,रा. बंगाली पंजा, पिली मारबत चौक नागपूर, अंकीत रामचंद्र धुर्वे वय 18 वर्ष, रा. गल्ली नंबर 23 एकलता नगर जयताळा रोड नागपूर, चंद्रकांत सुरेश शिन्दे वय 32 वर्ष, प्लाट नंबर 146 दाते लेआऊट जयताळा नागपूर, अभिषेक मंगेश गिरी, वय 19 वर्ष, रा. पाचपावली, स्वामी नगर, नंदगिरी रोड, महादेव मंदीर समोर, नागपूर, अंकित तुळशिराम निमजे, वय 24 वर्ष, रा. पाचपावली, स्वामी नगर, नंदगिरी रोड, महादेव मंदीर समोर, नागपूर आणि गौरव अजय पिल्ले, वय 22 वर्ष, रा. बिल्डींग नं. 102, क्वॉर्टर नं. 29, रेल्वे कॉलनी, गार्ड लाईन, बुध्द विहार जवळ, नागपूर यांनी कट रचुन दिनांक 20/07/2020 चे 11.30 वा सुमारास जख्मी गणेश मेश्राम व त्याची पत्नी सौ. प्रियंका गणेश मेश्राम वय 30 वर्ष यांना त्यांचे राहते घरात घुसुन अग्निशस्त्राने जिव घेण्याचे ईरादयाने गोळीबार करून गंभीर जख्मी केले असल्याचे सांगितल्याने एकुण 10 आरोपींना ताब्यात घेवुन तपास करीता पोलीस स्टेशन कळमेश्वर चे स्वाधीन केले. पुढील तपास ठाणेदार कळमेश्वर हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला व अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्ावार, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक सपोनि जितेंद्र वैरागडे, पोउपनि नरेंद्र गौरखेडे, पोउपनि सचिन मत्ते, पोउपनि जावेद शेख, सफौ जयप्रकाश शर्मा, पोहवा रमेश भोयर, पोहवा गजानन चौधरी, पोहवा राजेंद्र सनोडीया, पोहवा ज्ञानेश्वर राऊत, पोहवा महेश जाधव, पोहवा संतोष पंढरे, पोहवा मदन आसतकर, पोहवा सुरज परमार, पोहवा निलेश बर्वे, पोना सुरेश गाते, पोना दिनेश आधापुरे, पोशि राधेश्याम, पोशि महेश बिसने, पोशि अमोल वाघ, पोशि विपीन गायधने, पोशि बालाजी साखरे पोशि रोहन डाखोरे, मपोना कविता साखरे, चासफौ साहेबराव बहाळे, चापोहवा भाऊराव खंडाते, चापोना अमोल कुथे यांनी पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर